दिवंगत आर.आर.पाटील माजी उपमुख्यमंत्री यांचे स्मरणार्थ त्यांचे सांगली जिल्हयात भव्य स्मारक सभागृह उभारण्याच्या कामास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**ग्राम विकास व जलसंधारण विभाग**

**शासन निर्णय क्रमांक-बैठक-२०१६/प्र क्र १३८/पंरा-९**

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक :- ३१ जानेवारी, २०१८

**वाचा:-** (१) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्र.स्मारक-२०१६/प्र.क्र.०३/पंरा-९, दिनांक ११ ऑगस्ट, २०१६.

(२) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०१६/प्र.क्र.८९/अर्थ-३, दिनांक २०.०४.२०१६

(३) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. संकिर्ण-२०१७/प्र.क्र.०७/कोषा-प्र-५, दि.१०.०५.२०१६

(४) शासन निर्णय, ग्राम विकास विभाग, क्र.बैठक-२०१६/प्र.क्र.१३८/पंरा-९, दि. ३१ मार्च २०१७

**प्रस्तावना:-**

मा.मंत्री (वित्त व नियोजन) यांनी विधानमंडळाच्या अधिवेशनात सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पिय भाषणात दिवंगत आर.आर. पाटील यांचे स्मरणार्थ सांगली येथे भव्य स्मारक बांधण्यात येईल, असे घोषीत केले. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली यांचे दि.२२.१२.२०१६ रोजीच्या पत्रान्वये, दिवंगत आर. आर.पाटील यांचे सांगली जिल्ह्यातील सांगली मिरज रोडवरील जिल्हा परिषदेच्या मालकीच्या महात्मा गांधी वसतिगृह, सांगली येथे स्मारक बांधकामासाठी रु.९.९७ कोटी (अक्षरी रुपये नऊ कोटी सत्त्याण्णव लक्ष फक्त) इतक्या किमंतीचा प्रस्ताव शासनास मान्यतेकरिता सादर केला होता.

सदर प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सहमती करिता सादर केला असता सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रस्ताव तपासून रुपये ९.७१ कोटी (अक्षरी रुपये नऊ कोटी एकाहत्तर लक्ष फक्त) इतक्या प्रकल्प किंमत व अंदाजपत्रकास सहमती दर्शविली आहे. त्यानुसार सदर प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

दिवंगत आर.आर.पाटील यांचे सांगली जिल्ह्यातील सांगली मिरज रोडवरील जिल्हा परिषदेच्या मालकीच्या महात्मा गांधी वसतिगृह, सांगली येथील स्मारक बांधकामाच्या रुपये ९.७१ कोटी (अक्षरी रुपये नऊ कोटी एकाहत्तर लक्ष फक्त) इतक्या रक्कमेच्या आराखडे व अंदाजपत्रकांना या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. तसेच यापूर्वी रु. २८६.८० लक्ष इतका निधी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांना वितरीत केले असून सदर अनुदान दि. ३१.३.२०१८ पर्यंत खर्च करावयाचे असून उर्वरीत निधी रु. ६८४.२० लक्ष वितरीत करण्यात येत असून हे अनुदान दि. ३१.३.२०१९ पर्यंत खर्च होणे अपेक्षित आहे. या प्रकरणी कोणत्याही प्रकारची अनियमितता होणार नाही, याची सर्व संबंधितांनी तीव्र दक्षता घ्यावी, अन्यथा शासनाकडून कारवाई केली जाईल.

२. तसेच, सदर स्मारकाच्या बांधकामाच्या आराखडयास सार्वजनिक बांधकाम विभागाने खालील प्रमाणे सूचना दिलेल्या आहेत.

अ) सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र.बीडीजी-२०१४/प्र.क्र.९६/इमा-३, दि.०८/०७/२०१४ मधील कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करण्यात यावी.

ब) काम सुरु करण्यापूर्वी जागेच्या मालकी हक्काबाबतची पूर्तता करुन घ्यावी.

क) प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र.इएनव्ही-२०१३/प्र.क्र. १७७/तां.क.१, दि.१० जानेवारी, २०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार कार्यवाही करण्यात यावी.

ड) काम सुरु करण्यापूर्वी सदर नकाशे व अंदाजपत्रकावर मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे व उपभोक्त विभागाचे सक्षम अधिकारी यांनी स्वाक्षरी करणे आवश्यक आहे.

इ) काम सुरु करण्यापूर्वी इमारतीचा सविस्तर आराखडा व नकाशे तयार करुन शासकीय मुख्यवास्तुशास्त्रज्ञ, महाराष्ट्र राज्य यांची मंजूरी घेणे आवश्यक आहे.

३. ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र.स्मारक-२०१६/प्र.क्र.०३/पंरा-९, दिनांक ११ ऑगस्ट, २०१६ मधील परिच्छेद-४ (३) अन्वये शासकीय निधीतून शासकीय जागेवर स्मारक उभारण्यात यावे अशी स्पष्ट तरतूद आहे. तथापि, दिवंगत आर. आर. पाटील यांचे स्मारक बांधकाम सुरु करण्यापूर्वी स्मारकाची जागा शासनाच्या किंवा जिल्हा परिषद यांच्या नावे हस्तांतरित करुन घेण्यात यावी. या अटीच्या अधिन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

४. सदर खर्च हा लेखाशिर्ष-मागणी क्रमांक-एल-३, २०१५-इतर ग्राम विकास कार्यक्रम, १९६ जिल्हा परिषदांना / जिल्हास्तरीय पंचायतीना सहाय (००) (०६) थोर व्यक्तींची स्मारके उभरण्याकरिता अनुदान (२५१५२४८६), ३१ सहायक अनुदान (योजनांतर्गत) या लेखाशिर्षांतर्गत मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

५. उपरोक्त निधीतून खर्च करण्याकरिता कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग, सांगली यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषीत करण्यात येत आहे. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

६. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांनी स्मारकाच्या कामाची प्रगती तसेच निधी उपयोगिता संबंधीची माहिती, उपयोगिता प्रमाणपत्र वेळोवेळी शासनास सादर करावी व महालेखापालांच्या लेख्याशी खर्च मेळाबाबतची कार्यवाही करावी.

७. सदर स्मारकाच्या बांधकामावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी स्मारक समितीची राहील.

८. सदर शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक १३७/१६/इमा-३, दिनांक ४.२.२०१७ व मा. मुख्य सचिवांच्या कार्यालयाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक ९, दिनांक २९.११.२०१७ व मा. मुख्यमंत्री कार्यालय, नस्ती क्र. ७११७/२०१७, दि. ६.१२.२०१७ अन्वये मिळालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्य www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संकेताक २०१८०२०२११४०००२४२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षंकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Manoj D Jadhav

Digitally signed by Manoj D Jadhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=RDD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a83fc829949e9b1a022b031436c946028b48d51f5a1bf36ca3ce4fead857da72, cn=Manoj D Jadhav
Date: 2018.02.03 17:55:10 +05'30'

**( मनोज जाधव )**

उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.मंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई.
४. मा.राज्यमंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा.पालकमंत्री, सांगली जिल्हा यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. विभागीय आयुक्त पुणे.
८. जिल्हाधिकारी, सांगली
९. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली.
१०. जिल्हा कोषागार अधिकारी, सांगली.
११. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.
१२. महालेखापाल-१ (लेखापरिक्षा) मुंबई.
१३. सहायक जिल्हा नियोजन अधिकारी, सांगली.
१४. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सांगली.
१५. कक्ष अधिकारी, का-२५, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. कार्यासन अधिकारी (इमा-१ व इमा-३), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७. नियोजन विभाग (का.१४७४/१४४४) मंत्रालय, मुंबई-३२.
१८. वित्त विभाग (व्यय -१५, अर्थसंकल्प-१६/१७), मंत्रालय, मुंबई ३२.
१९. कक्ष अधिकारी, कार्यासन क्र.वित्त-७, वित्त-१, वित्त-८, ग्राम विकास व जलसंधारण विभाग .
२०. कार्यासन पंरा-९/ योजना-६ संग्रहार्थ.